1) 31/12/2024

# मसगा कॉलेजात स्व. रेणूका आजी जयंती साजरी



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे स्वर्गीय रेणुका आजी हिरे यांची ११७ वी जयंती साजरी करण्यात आली . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या हस्ते स्वर्गीय रेणुका आजी यांच्या समाधीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर महाविद्यालयात रेणुका आजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी स्वर्गीय रेणुका आजी यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. कर्मवीर भाऊसाहेब यांच्या प्रत्येक कार्याचे मोजमाप करणे अशक्य आहे आजी ह्या भाऊसाहेबांच्या मागे सावली प्रमाणे उभ्या राहील्या आजीच्या जीवनात अनेक संकटे आली पण त्या डगमगल्या नाही.व आजीच्या कार्यावर प्रकाशझोत टाकला.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांनी स्वर्गीय रेणुका आजी यांच्या विविध आठवणी सांगताना संस्था व समाजाविषयी त्यांची असलेली निष्ठा व आपुलकी या विषयी माहिती दिली.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनिष सोनवणे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे महाविद्यालयाचे कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सी .डी .राजपूत यांनी केले तर आभार प्रा. आर् ए. पवार यांनी मानले.

2) 17/12/24

# मसगाची कोमल शेलार ठरली छत्रपती करंडकाची मानकरी



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथील टीवायबी एससी ची विद्यार्थिनी कुमारी कोमल नरेंद्र शेलार हिने नुकत्याच अकोला येथे पार पडलेल्या छत्रपती करंडक ह्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. ह्या स्पर्धेत १२५ स्पर्धाकांनी सहभाग नोंदविला. ही स्पर्धा शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात पार पडली. संविधान, शेतकरी आत्महत्या, अर्थव्यवस्था, राजकारण, अशा विविध विषयांवर आपले परखड मत स्पर्धकांनी मांडले. मसगा महाविद्यालयाची कुमारी कोमल शेलार हिने छत्रपती करंडक-२०२४ जो अतिशय मानाचा मानला जातो तो जिंकून रोख ११, १११/- चे बक्षीस पटकवले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत जी दिघावकर, उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, डॉ मनीष सोनवणे, डॉ प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार यांनी अभिनंदन केले. कु. कोमल शेलार हिस सांस्कृतिक विभाग प्रमुख देवेंद्र सोनवणे, डॉ सी एम निकम, डॉ डी जी जाधव, डॉ आर एन निकम डॉ राज त्रिभुवन यांचे मार्गदर्शन लाभले.

3) 19/10/24

नियोजित मालेगांव जिल्ह्याचे मुखपत्र
आजचा
दिनकर

# म स गा महाविद्यालयात आरोग्य संपदा योजनेंतर्गत कन्या माता समुपदेशन शिबिर

**मालेगाव ।**

**येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य म हाविद्यालयात आरोग्य संपदा योजनेंतर्गत कन्या माता समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

संस्थेच्या विश्वस्त संपदा हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थींनी व त्यांच्या माता यांचे मानसिक समुपदेशन करण्यात आले.यावेळी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रमेश निकम आणि प्रा. नम्रता पोफळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आजच्या आधुनिक काळात मानसिक ताण तणाव कमी करण्यासाठी आई आणि मुलीच्या नात्यामध्ये संभाषण आणि एकमेकींना समजून घेण्याची गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी अध्यक्षीय मनोगतातून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. तसेच महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करणारे कायदे कोणते आहेत आणि ते माहिती असणे कसे आवश्यक असते याविषयी माहिती सांगितली. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी शिबीराच्या आयोजनाचे महत्व विषद केले.

शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनिष सोनवणे यांनी प्रमुख व्याख्यातांचे स्वागत केले. महाविद्यालयातील समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे निरामय आरोग्य केंद्राच्या संचालिका डॉ भारती खैरनार यांनी प्रास्ताविक केले व उपस्थितांचे आभार मानले. या शिबिरात एकूण शंभरहून अधिक विद्यार्थींनी व त्यांच्या माता यांनी सहभाग घेतला.

# म स गा महाविद्यालयात आरोग्य संपदा योजनेंतर्गत कन्या माता समुपदेशन शिबिर

**मालेगाव ।**
**येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य म हाविद्यालयात आरोग्य संपदा योजनेंतर्गत कन्या माता समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

संस्थेच्या विश्वस्त संपदा हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थींनी व त्यांच्या माता यांचे मानसिक समुपदेशन करण्यात आले.यावेळी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रमेश निकम आणि प्रा. नम्रता पोफळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आजच्या आधुनिक काळात मानसिक ताण तणाव कमी करण्यासाठी आई आणि मुलीच्या नात्यामध्ये संभाषण आणि एकमेकींना समजून घेण्याची गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी अध्यक्षीय मनोगतातून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. तसेच महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करणारे कायदे कोणते आहेत आणि ते माहिती असणे कसे आवश्यक असते याविषयी माहिती सांगितली. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी शिबीराच्या आयोजनाचे महत्व विषद केले.

शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनिष सोनवणे यांनी प्रमुख व्याख्यातांचे स्वागत केले. महाविद्यालयातील समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे निरामय आरोग्य केंद्राच्या संचालिका डॉ भारती खैरनार यांनी प्रास्ताविक केले व उपस्थितांचे आभार मानले. या शिबिरात एकूण शंभरहून अधिक विद्यार्थीनी व त्यांच्या माता यांनी सहभाग घेतला.

4) 11/12/24

# मसगाच्या विद्यार्थीनींचा तिहेरी सुवर्ण पदकाने सन्मान



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एम.एस्सी. भौतिकशास्त्र विषयाची विद्यार्थिनी शाहिस्ता जमील जमील अहमद हिला पुणे विद्यापीठाच्या २०२१-२०२२ मध्ये झालेल्या परीक्षेत संपूर्ण पुणे विद्यापीठात सर्वात जास्त गुण मिळालेत. त्या निमित्ताने विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या हस्ते शाहिस्ताला तिहेरी गोल्ड मेडलने सन्मानित करण्यात आले. यामध्ये तिला पुरुषोत्तम नारायण भोगोटे गोल्ड मेडल, स्वर्गीय प्राचार्य चंद्रात्रे गोल्ड मेडल, विद्यावाचस्पती दिवाकर अभ्यंकर गोल्डमेडल अशा तीन मेडलने सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, विभागप्रमुख डॉ. के. एस. ठाकरे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील, डॉ. मनीष सोनवणे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. शाहिस्ताला भौतिकशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. के. एस. ठाकरे, प्रा. चेतन येवले, प्रा. सतीश मांडवडे, प्रा. सूर्यकांत तिवारी, प्रा.मानसी ठोके, प्रा. हितेश सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

# मसगा कॉलेजात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे भारत रत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरीनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर प्राध्यपिका लिना पगारे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व महापरिनिर्वाण दिनाविषयी माहिती सांगितली त्या म्हणाल्या की डॉ. आंबेडकरांचा वारसा आजही देशभरात प्रेरणास्त्रोत आहे. सामाजिक न्याय, शिक्षण आणि समता या क्षेत्रात त्यांनी सुरू केलेली क्रांती नेहमीच प्रासंगिक राहील. त्यांच्या कल्पना आणि योगदान वंचितांच्या सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड ठरले. या प्रसंगी डॉ दिघावकर म्हणाले की भारतामध्ये संविधान आणि लोकशाहीची जेव्हा जेव्हा चर्चा होते तेव्हा बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर यांचे नाव ठळकपणे घेतले जाते. त्यामुळेच भारतीय इतिहासात ६ डिसेंबर ही महत्त्वाची तारीख म्हणून नोंदवली जाते. या दिवशी देशभरात महापरिनिर्वाण दिन म्हणून डॉ. आंबेडकर यांना आदरांजली वाहिली जाते. या दिवशी भारताच्या राज्यघटनेचे निर्माते, समाज सुधारक डॉ. आंबेडकर यांचे १९५६ मध्ये निधन झाले. या प्रसंगी महाविदयालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रविण पाटील, प्रा.डॉ. मनिष सोनवणे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सी. डी. राजपूत यांनी केले तर आभार प्रा. डॉ. जे.टी. जाधव यांनी मानले.

# मसगा महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**मालेगाव ।**

माजी परिवहन व राजशिष्टाचार राज्यमंत्री डॉ. प्रशांत दादा हिरे यांच्या ७१ वाढदिवसानिमित्त महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व मालेगावातील सेवा ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमान रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी ३७ बॅग रक्ताचे संकलन करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट केले या प्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक डॉ. मनीष सोनवणे ,डॉ. प्रवीण पाटील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी प्रा. डॉ. नरेंद्र डोखे ,राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा. सूर्यभान सांगळे ,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. अशोक वाकचौरे ,सेवा ब्लड बँकेचे पीआरओ पुष्पक पगार, सचिन पिंगळे, विशाल शेवाळे, पियुष देवरे, प्रेम जाधव ,यांनी परिश्रम घेतले

---

सायं दैनिक
मोक्षिणी वार्ता
मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४
५

# मसगा कॉलेजात जेष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

[illegible]

# म.स.गा.महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



मालेगाव:- येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे कर्मविर भाऊसाहेब हिरे गुप्रचे चेअरमन तथा मा. परिवहन व राजशिष्टाचार राज्य मंत्री समाज श्री डॉ. प्रशांत दादा हिरे यांच्या वाढ दिवसानिमित्त आजी आजोबा यांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ख्यातनाम डॉ. राजेश सावंत आणि त्यांचे सहकारी यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिक आजी आजोबा यांची रक्तदाब, ऑक्सीजन लेव्हल, हिमोग्लोबिन व इतर आरोग्य तपासण्या केल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी अध्यक्षीय भाषणात आरोग्या विषयी जागरूक असणे ही काळाची गरज आहे असे सांगितले. उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे यांनी शिबिराचे आयोजनाचे उद्देश आणि महत्व विषद केले. शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनिष सोनवणे आणि डॉ. प्रविण पाटील यांनी शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रयत्न केले. निरामय आरोग्य केंद्राच्या संचालिका डॉ. भारती खैरनार, डॉ. दिलीप अहिरे, डॉ. येलमाने यांनी शिबिराचे आयोजन केले.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मिलिंद कुलकर्णी पर्यवेक्षक डॉ. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे परयवेक्षक अजिंक्य ठाकरे, वरिष्ठ कनिष्ठ आणि किमान कौशल्य विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. या शिबिरात एकूण शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिक आजी आजोबा यांची आरोग्य तपासणी कर आली

# मसगा कॉलेजतर्फे स्वच्छता अभियान



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प एनएसएस विभागातर्फे एक दिवशीय स्वच्छता कॅम्प वडगाव येथे देवी मंदिर परिसरात राबविण्यात आला सदर अभियानात त विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली तसेच प्लास्टिक जमा केले या कार्यक्रमाला कार्यक्रमाधिकारी प्रा.अशोक वाकचौरे अनंत बाविस्कर डॉ.सपना सोनवणे तसेच एन एस एस विभागाचे १२० विद्यार्थी उपस्थित होते. स्वच्छता हीच सेवा हे शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनात रुजावे हा त्यामागे उद्देश होता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.जी. दिघावकर तसेच उप. प्राचार्य डॉ अनिल सावळे यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्यात.

# वाचनाने माणसाचे आयुष्य समृद्ध होते- प्राचार्य दिघावकर




मालेगाव । ग्रंथ हे माणसाचे सर्वात जवळचे मित्र असून ते आयुष्यभराची शिदोरी असतात. ग्रंथांच्या सहवासाने माणूस प्रगल्भ होतो आणि त्याचे आयुष्य समृद्ध झाल्याशिवाय राहत नाही असे भावपूर्ण प्रतिपादन महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी केले. भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन स्व. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने मराठी विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा होत असणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतीय साहित्य निर्मितीची परंपरा ही अत्यंत वैभवशाली असून या परंपरेमध्ये हजारो लोकांनी आपले योगदान दिले आहे, त्यामुळे ग्रंथाचा सर्वांनी पुरेपूर वापर करून आपले ज्ञान रोजच्या रोज वृद्धिंगत करावे आणि इतरांनाही त्याचा उपयोग करण्यासाठी मदत करावी असेही डॉ. दिघावकर पुढे म्हणाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. ए. जी. नेरकर यांनी केले. यावेळी ख्यातनाम साहित्यिक डॉ. विनोद गोरवाडकर यांनी वाचन संस्कृतीवर विशेषत्वाने भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख डॉ. निलेश नागरे यांनी केले. याप्रसंगी कला शाखेचे पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, विज्ञान शाखेचे परिवेक्षक डॉ. प्रवीण पाटील हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. दिघावकर यांच्या हस्ते ग्रंथालयात भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे याप्रसंगी उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास मराठी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अरुण पाटील, डॉ. जी. जे. भामरे, डॉ. सपना सोनवणे, डॉ. संतोष कन्नोर, प्रा. उज्वला अहिरे, सहाय्यक ग्रंथपाल के.यु.अहिरे व ग्रंथालय कर्मचारी डी. एस.बोराळे, बी.एच.नरोडे, निलेश पवार, स्वप्नील वाघ, भूषण पाटील, सौ. संगीता खैरनार यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मसगा कॉलेजच्या खेळाडूंची आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड

मालेगाव । हलूल महाविद्यालय आयोजित अंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेतून पुणे येथे होणाऱ्या अंतर विभागीय हॉकी स्पर्धेसाठी मसगा महाविद्यालयाच्या खेळाडूंची निवड झाली आहे . दि. १५ व १६ ऑक्टोबर रोजी पुणे येथे होणाऱ्या अंतर विभागीय हॉकी स्पर्धेसाठी मसगा महाविद्यालयातील खेळाडू कु. जयेश भट व कु. समीक्षा गुंड या दोघांची नाशिक विभागाच्या संघात निवड झाली. सदर खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्र. संतोष जाधव व संदीप कोळुतकर यांचे मार्गदर्शन लाभले. सदर म स गा महाविद्यालयाच्या खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री. डॉ. प्रशांत हिरे, संस्थेचे समन्वयक म. शिक्षक आमदार डॉ. अपूर्व हिरे, पुजा गेले डॉ अद्वय हिरे पाटील, संस्थेच्या शिक्षण तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख संपदा हिरे, उपाध्यक्ष डॉ. हरिष आडके, संस्थेचे सह सचिव डॉ. व्ही.एस. मोरे, व महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ सी जी दिघावकर उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनिष सोनवणे डॉ. प्रवीण पाटील कुलसचिव रघुनाथ शेलार यांनी कौतुक करून अभिनंदन केले.



# मुलींनी स्वतःच्या बचावासाठी आत्मनिर्भर होणे गरजेचे : प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर

**मालेगांव ।**

मुलींना आत्मसंरक्षणासाठी कराटे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करण्यात आले.

मसगा कनिष्ठ महाविद्यालयाच्या सखी सावित्री व विशाखा समितीच्या माध्यमातून मुलींना आत्मसंरक्षण तथा स्वतःच्या बचावासाठी उपयोगी ठरतील अशा प्रकारच्या प्रात्यक्षिकांचे धडे कराटे प्रशिक्षक तनिष्का गवळी, यशोदीप शिंदे यांनी सादर करून मुलींनी स्वतःचा बचाव कसा करावा स्वतः प्रात्यक्षिक करून दाखवले या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी.दिघावकर यांनी मुलींनी स्वतःच्या बचावासाठी आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज असून त्यासाठी कराटे प्रशिक्षण व आपल्या बचावासाठी छोटे छोटे गोष्टी शिकून घेणे फार महत्त्वाचे आहे तसेच कुणीही त्रास दिला तर आमच्याकडे तक्रार करावी असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले तर उपप्रचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी यांनी समाजात अवतीभवती दररोज वेगवेगळ्या गोष्टी ऐकायला मिळतात म्हणून मुलींनी व महिलांनी कायम दक्ष रहावे असे मत मांडले तर पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी आज वेगवेगळ्या क्षेत्रात जरी महिला स्वतःच्या पायावर उभे असतील तरी काही प्रसंगी त्यांच्यावर समाजविघातक घटना घडुन येताना दिसतात त्यामुळे मुलींना आत्मसंरक्षणाची व बचावाची आवश्यकता असते म्हणून आजचे प्रात्यक्षिक हे त्यांना आपल्या भावी आयुष्यात निश्चितच उपयोगी ठरेल असे मत मांडले याप्रसंगी प्रा. दीपक सूर्यवंशी विशाखा समितीचे अध्यक्ष प्रा. सपना हिरे प्रा.लीना शेलार, प्रा.कामिनी पवार प्रा.शशिकांत भदाणे प्रा.विजय देवरे आधी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पवार यांनी तर आभार प्रदर्शन सुलभा अहिरे यांनी केले.

मोहन


विकी विद्या का व्हिडीओ
१२, ९॥ वा.

सायं.दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात कबड्डी मुली स्पर्धा संपन्न



मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमनाने आयोजित अंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धा महाविद्यालयाच्या प्रांगणात यशस्वीरित्या संपन्न झाल्या. क्रीडा स्पर्धेसाठी लाभलेले संस्थेचे उपअध्यक्ष आदरणीय हरीश आडके यांची प्रमुख उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे होते. प्रतिमा पूजनाने क्रीडा स्पर्धे च्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनाने खेळाडूंमध्ये उत्साह निर्माण झाला त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विविध खेळाचे खेळाडूंचे दाखले देत खेळाडू कसा उत्कृष्ट असतो, खेळामुळे मिळणारा मान सन्मान मोठा असतो. असे प्रतिपादन केले. खेळाडू हा स्वतः चे, महाविद्यालयाचे, जिल्ह्याचे, राज्याचे नाव लौकिकत भर पाडतो. विविध क्रीडा कौशल्य आत्मसात केल्याने प्रगती करत असतो असे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाप्रसंगी विविध महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक व खेळाडू उपस्थित होते. एकूण २३ मुलींच्या संघानी सहभाग नोंदवला. यामध्ये अंतिम सामना हा के. टी. एच. एम. कॉलेज व सायखेडा कॉलेज यांच्यामध्ये अतिशय चुरशीचा सामना झाला. विजयश्री सायखेडा महाविद्याल याने मिळवला. क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा विभागाचे विभागीय सचिव नरेंद्र निकम उपसचिव डॉ मनीष देवरे शहर विभाग उपसचिव प्रा.चेतन आव्हाड माजी सचिव डॉ. दिपक जंद्रे डॉ. ज्ञानेश्वर गडाख प्रा. हेमंत पाटील डॉ. मिनाक्षी गवळी व नाशिक विभागातील विविध महाविद्यालयातील क्रीडा संचालक नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन चे पंच मंडळ उपस्थित होते. कबड्डी स्पर्धे च्या यशस्वी संयोजनासाठी महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे डॉ. प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शना खाली क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडूरकर, जिमखाना कर्मचारी भूषण ठाकरे, क्रीडा विभागाचे स्वयंसेवक खेळाडू यांनी परिश्रम घेतले केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा मार्गदर्शक संतोष जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुरेखा दप्तरे यांनी केले.

9:08 PM | 0.0KB/s 76%

सायं दैनिक
मोक्षिणी वार्ता
शुक्रवार, दि. ११ ऑ

# मसगा कॉलेजात कबड्डी मुली स्पर्धा संपन्न



मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमनाने आयोजित अंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धा महाविद्यालयाच्या प्रांगणात यशस्वीरित्या संपन्न झाल्या. क्रीडा स्पर्धेसाठी लाभलेले संस्थेचे उपअध्यक्ष आदरणीय हरीश आडके यांची प्रमुख उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे होते. प्रतिमा पूजनाने क्रीडा स्पर्धेच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनाने खेळाडूंमध्ये उत्साह निर्माण झाला त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विविध खेळाचे खेळाडूंचे दाखले देत खेळाडू कसा उत्कृष्ट असतो, खेळामुळे मिळणारा मान सन्मान मोठा असतो. असे प्रतिपादन केले. खेळाडू हा स्वतःचे, महाविद्यालयाचे, जिल्ह्याचे, राज्याचे नाव लौकिकत भर पाडतो. विविध क्रीडा कौशल्य आत्मसात केल्याने प्रगती करत असतो असे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाप्रसंगी विविध महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक व खेळाडू उपस्थित होते. एकूण २३ मुलींच्या संघानी सहभाग नोंदवला. यामध्ये अंतिम सामना हा के. टी. एच. एम. कॉलेज व सायखेडा कॉलेज यांच्यामध्ये अतिशय चुरशीचा सामना झाला. विजयश्री सायखेडा महाविद्याल याने मिळवला. क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा विभागाचे विभागीय सचिव नरेंद्र निकम उपसचिव डॉ मनीष देवरे शहर विभाग उपसचिव प्रा.चेतन आव्हाड माजी सचिव डॉ. दिपक जंद्रे डॉ. ज्ञानेश्वर गडाख प्रा. हेमंत पाटील डॉ. मिनाक्षी गवळी व नाशिक विभागातील विविध महाविद्यालयातील क्रीडा संचालक नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन चे पंच मंडळ उपस्थित होते. कबड्डी स्पर्धेच्या यशस्वी संयोजनासाठी महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे डॉ. प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शना खाली क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडूरकर, जिमखाना कर्मचारी भूषण ठाकरे, क्रीडा विभागाचे स्वयंसेवक खेळाडू यांनी परिश्रम घेतले केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा मार्गदर्शक संतोष जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुरेखा दमरे यांनी केले.

# विद्या विकास स्कूलचा वर्धापन



मालेगाव । विद्याविकास इंटरनॅशनल स्कूल चा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वर्गीय अण्णासाहेब तथा सुधीर बाबुराव पेठकर यांना जन्मदिवसा निमित्ताने रवींद्र जगताप यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

अण्णा साहेबांना सामाजिक कार्याची विशेष आवड होती. शासनाच्या सिटीसर्वे विभागात ते कार्यरत होते. नोकरीत असतानाच दुर्दैवाने ४ मे १९९९ रोजी अण्णासाहेबांचे निधन झाले. घरातील शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणात असलेले प्रसाद पेठ स्मरणार्थ ११ ऑ विकास इंटरनॅशनल केले. छोटेसे लावले विद्या पेठकर, अ अथक प्रयत्नाने आ ले आहे. असे प्रिय साधताना बोलत ह कार्यक्रमाचे सूत्रसंचा यांनी आभार प्रदर्शन शिक्षक शिक्षकेतर क

# महादेव ॲपच्या माध्यमातून ६ हजार फसवणूक; आरोपी सौरभ चंद्राकरला

नवी दिल्ली । महादेव सत्ता पच्या किंगपिन सौरभ चंद्राकर याला दुबईत ताब्यात घेण्यात आल्याची बातमी आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) विनंतीवरून इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटीस अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. यूएईच्या अधिकाऱ्यांनी सौरभ चंद्राकरच्या ताब्यात असल्याची माहिती भारत सरकार आणि सीबीआयला दिली आहे. त्याच्या अटकेची बातमी आल्यानंतर आता त्याच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. सौरभ चंद्राकरला लवकरच भारतात आणण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. सौरभ चंद्राकरला डिसेंबर २०२३ मध्ये दुबई मध्ये ताब्यात घेण्यात आले होते, तेव्हा



पासून तो दुबई पोलिसांच्या ताब्यात आहे. त्याला भारतात पाठवण्याची जवळपास सर्व औपचारिकता पूर्ण झाली असून येत्या १० दिवसांत त्याला भारतात पाठवले जाईल, असे ईडीच्या सूत्रांचे म्हणणे आहे.

सौरभ चंद्राकर याच्यावर ६ हजार कोटींहून अधिक रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप आहे. हजार कोटींच्या घोटाळ्यातील हा आरोपी पूर्वी सामान्य ज्यूस विक्रेता होता. काही वर्षांपूर्वीपर्यंत सौरभ

मोहन
रोज ४ शो
शो. १२, ३॥ वा.



वैभव शो. १२,३॥,६॥,९॥ वा. रोज ४ शो


Edit Annotate Fill & Sign Convert All

# भारतीय ज्ञानव्यवस्था अध्यापन महाविद्यालयीन स्तरावर उपयुक्त- प्राचार्य दिघावकर



मालेगाव । येथील म.स.गा महाविद्यालयात भारतीय ज्ञानव्यवस्था अध्यापन या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. विद्यापिठीय पातळीवर नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्रथम वर्ष कला,वाणिज्य, विज्ञान आणि संगणक या वर्गाच्या अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानव्यवस्था विषय अनिवार्य केला आहे. या अनुषंगाने प्राचीन भारतीय ज्ञान,विज्ञान ,तत्व- ज्ञान आणि स्थापत्यकला या गौरवशाली परंपरेची विध्यार्थ्यांना माहिती व्हावी हा त्यामागचा उद्देश आहे. या कार्यक्रमात संसाधन व्यक्ती म्हणून नाशिक येथील एच.पी.टी महाविद्यालय आणि कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हरसुल, इतिहास विभागप्रमुख व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा.डॉ.अतुल ओहळ व प्रा.डॉ. संजय शेलार, तसेच लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी येथील प्रा. डॉ. प्रगती मारकवार यांनी विध्यार्थ्यांना भारतीय ज्ञानव्यवस्था या अनुषंगाने मार्गदर्शन केले. डॉ.अतुलओहळ यांनी प्राचीन भारतीय ज्ञानव्यवस्था, संशोधन हेतू, विचार प्रणाली व तत्वज्ञान या संदर्भात माहिती दिली. डॉ. संजय शेलार यांनी प्राचीन भारतीय विज्ञान संशोधक आर्यभट्ट, वराह मिहीर, सवाई जयसिंह यांचा भारतीय विज्ञान क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला. डॉ. प्रगती मारकवार यांनी प्राचीन भारतीय भाषा, शिक्षण पद्धती व तक्षशीला, नालंदा, आणि वल्लभी विद्यापीठे यांचे भारताच्या जडण घडणीतील योगदान या विषयी माहिती दिली.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.टी.एस.सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. कल्याण कोकणे, इतिहास विभाग प्रमुख अजय अहिर, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा.जयेश भावसार, प्रा. भारत आहेर, प्रा. यु.के कुडासे, प्रा.सिमा हरणे, प्रा. डॉ. नसीम अन्सारी, प्रा. धनंजय पवार, प्रा.राहुल देसले, प्रा व्ही.के. पवार, प्रा.ए.एन.पाचंगे आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इतिहास विभागाचे प्रा. एस.एल अहिरे यांनी केले.

सांज. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात विज्ञान मंडळाचे उद्घाटन संपन्न

मालेगाव । महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मालेगांव कॅम्प येथे विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले, याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून मालेगाव येथील प्रसिद्ध निसर्गोपचार व शेतीतज्ञ जितू भाई कुटमुटिया हे होते. कुटमुटिया यांनी निसर्गोपचार व शेती विषयी माहिती सांगताना सांगितले की निसर्गोपचार ही एक पारंपरिक उपचार पद्धती असून ती शरीराला कमीत कमी त्रास देऊन अवलंबिली जाते. या पद्धतीत कमीत कमी शल्यक्रिया आणि औषधांचा उपयोग केला जातो. ताण नियंत्रण, आरोग्यदायी आहाराचे योग्य नियमन, मानसिक संतुलन आणि पंचमहाभूतांचा 'योग्य'



वापर यांचा अवलंब करतात. यामुळे रोग होणे मुळातच टाळता येईल आणि रोग झालाच तर अंतर्गत 'चैतन्य' तो पूर्ण बरा करेल, अशी या उपचार पद्धतीची धारणा असते. आजार पूर्णपणे बरा नाही झाला तर माती, पाणी, सूर्यप्रकाश व शुद्ध हवा यांच्या मदतीने उप- चार करून रोगाची तीव्रता कमी करता येते. हे सर्व सांगताना त्यांनी विविध प्रकारचे प्रयोग करून दाखवताना आपण जे पॉझिटिव्ह व निगेटिव्ह विचार करतो त्याचा आपल्या शरीरावर कशाप्रकारे परिणाम होतो हे सांगितले, याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी निसर्गोपचार पद्धती व सेंद्रिय शेती याची माहिती दिली. कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक प्रा. प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. एस.डी. पाटील, पाहुण्यांचा परिचय प्रा डी.बी सोनवणे यांनी करून दिला. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ एन. बी. शिरसाठ यांनी तर आभार प्रा. कुलदीप पडियार यांनी मानले.

12/09

सकाळ

# विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी पालकांची भूमिका महत्त्वपूर्ण: प्राचार्य डॉ. सी.जी.दिघावकर

**मालेगांव ।**

म.स.गा.कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक व पालक यांच्यात संवाद व समन्वय साधण्याच्या हेतूने वार-मंगळवार रोजी विद्यार्थी- शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी. दिघावकर तर प्रमुख पाहुणे म्हणुन पालक प्रतिनिधी जगदीश निकम , भरत आहिरे उपप्राचार्य प्रा.मिलिंद कुलकर्णी पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे, प्रा दीपक सूर्यवंशी व्यासपिठावर विराजमान होते. मेळाव्यासाठी ५०-६० पालक तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

पालक मेळाव्याचा उद्देश अन् महाविद्यालयातील चालणा-या इतर उपक्रमाची माहिती प्रास्तविकातुन पर्यवेक्षक रविंद्र मोरे यांनी दिली. पालकाचे प्रतिनिधी म्हणुन श्रीमती नितु शहा यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रम ांचे कौतुक केले. जगदीश निकम यांनीआपल्या मनोगतात कुटुंब आणि शिक्षक यांना जोडणारा दुवा म्हणजे महाविद्यालय व मुलांना संस्कार देण्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडत असते असे सांगितले.सदर कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा.मिलिंद कुलकर्णी यांनी पालकांना आवाहन केले की आमच्या काही उणिवा असतील तर त्या नि:संकोचपणे महाविद्यालयाला कळवावे. त्या सोडवण्यास महाविद्यालय सतत तत्पर राहील.अध्यक्षीय मनोगतातुन प्राचार्य डा.सी.जी.दिघावकर सरांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी पालकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते तसेच म हाविद्यालयात विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्वात विकास होतो.महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा राबविले जातात त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा महाविद्यालय अशा विद्यार्थ्यांना संपुर्णपणे मदत करेल असे नमुद केले यावेळी पालक प्रतिनिधी भरत आहिरे विद्यार्थी प्रतानिधी शिखा यादव, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. .मिलिंद पवार सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार चंद्रशेखर कन्नोर यांनी मानले. पालक मेळाव्यासाठी प्रा.योगेश सावंत,प्रा.हितेश पवार, प्रा.विजय देवरे,प्रा.प्रविण सुर्यवंशी प्रा सपना हिरे, प्रा कामिनी पवार, प्रा लीना शेलार यांनी परिश्रम घेतले. पालक मेळाव्यास महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते.

12/9

नियोजित मालेगांव जिल्ह्याचे मुखपत्र
आजचा
दिनकर

# मसगा कॉलेजात वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन संपन्न



मालेगाव । शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या लोकनेते व्यंकटराव हिरे सभागृहात वाणिज्य मंडळामार्फत वाणिज्य मंडळाचे उद्घाटन आयोजित करण्यात आले होते सदर कार्यक्रमउद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हरीष आडके उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी जी दिघावकर उपस्थित होते.

आपल्या उद्घाटन पर भाषणात डॉ.आडके यांनी वाणिज्य विभागामार्फत विद्यार्थ्यांना रोजगार विषयक तसेच व्यवसायाविषयी विविध गोष्टी कशा आत्मसात केल्या पाहिजेत आणि त्या ज्ञान आणि कौशल्य यांच्या जोरावर कशा प्रभावीपणे मांडाव्यात यासंबंधीची माहिती आपल्या भाषणात दिली तसेच वाणिज्य शाखेचा विद्यार्थी हा इतर विद्यार्थ्यां पेक्षा कसा वेगळा ठसा उमटू शकतो यासंबंधी अतिशय सोप्या भाषेमध्ये विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे भाषण दिले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. सी जी दिघावकर यांनी वाणिज्य विभागाची स्था-पना इतिहास तसेच वाणिज्य विभागाच्या उल्लेखनीय बाबींची ओळख आपल्या भाषणातून करून दिली तसेच वाणिज्य विभागाचे विद्यार्थ्यांसाठी योगदान आणि महाविद्यालया मार्फत कशाप्रकारे उपक्रम राबविले जातात यावर प्रकाश टाकला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विजय मिस्तरी यांनी केले, सूत्रसंचालन प्राध्यापिका लीना पगारे यांनी केले आभार प्रदर्शन प्राध्यापिका कोमल काळे यांनी केले .सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागाचे प्रमुख तसेच प्राध्यापक प्राध्यापिका विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वाणिज्य विभागातील सर्व सहकारी प्राध्यापक तसेच प्राध्यापक यांनी सहकार्य केले.

सांज. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात पर्यावरण पुरक श्रीगणेशमुर्ती कार्यशाळा संपन्न

मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या आय क्यु ए सी. राष्ट्रीय सेवा योजना , सांस्कृतिक व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी कलाशिक्षक पुरुषोत्तम गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू माती पासून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कशी तयार करावी याच प्रात्यक्षिक देण्यात आले. विद्यार्थ्यांनी ह्या आधुनिक युगात आपल्या भारतीय कलागुणांना वाव देऊन त्या जोपासण्यासाठी प्रयत्न करायला हवे तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक छंद म्हणून सुद्धा ह्या कलागुणांना महत्त्व दिले पाहिजे असे आवाहन गांगुर्डे सरांनी केले.

नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय कलागुणांचे महत्त्व जाणून त्याचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला आहे त्याचा फायदा नवीन पिढीला निश्चित होईल अशी अपेक्षा अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी जी दिघावकर यांनी व्यक्त केली. उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ प्रविण पाटील, भूगोल विभाग प्रमुख डॉ.सी एम निकम राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्र. अशोक वाघचौरे सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा. डी. बी. सोनवणे , डॉ राज त्रिभुवन सर्व विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ.गौतम कोलते यांनी मानले.

दैनिक
लोकनामा
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक



## एमएसजी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ

**मालेगाव :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात वाङमय मंडळाचे उद्‌घाटन झाले. ज्ञानेश्वर महाराजांपासून तुकाराम महाराजांपर्यंत साऱ्या संतांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून केलेली कामगिरी किंवा इतर भक्ती संप्रदायांच्या अनुयायांनी निर्माण केलेले साहित्य यामुळे समाज योग्य दिशेने मार्गक्रमण करू शकला. आज तो सुजाण झालेला दिसतो, असे हभप नरेंद्र महाराज गुरव यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. दिघावकर यांनी, वाङमयाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांच्या जीवनात त्यांनी काय करावयास हवे याविषयी मार्गदर्शन केले. केवळ कला शाखेलाच नव्हे, तर महाविद्यालयातील सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना साहित्याची गोडी लागणे आवश्यक आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यातून प्रगल्भ होऊ शकते, असे सांगितले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे व डॉ. प्रवीण पाटील उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन झाले. त्यानंतर वाङमय मंडळाचे अध्यक्ष हिंदी विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनोद गोरवाडकर यांनी परिचय करून दिला. डॉ. जी. जे. भामरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अनंत बाविस्कर यांनी आभार मानले.

23/8

सकाळ

# अवयवदान काळाची गरज : डॉ. नागेश अघोर

■ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव, ता. २३ : अवयव दान ही काळाची गरज आहे. अवयवदानाविषयी जास्तीत जास्त जनजागृती प्रचार, प्रसार करण्याचे आवाहन नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे संचालक व किडनी विकार, प्रत्यारोपण तज्ञ डॉ. नागेश अघोर यांनी केले.



येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भारतीय अवयवदान दिनानिमित्त त्यांचे जनजागृतीपर व्याख्यान झाले. त्यांनी मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ यानुसार अवयवदान म्हणजे काय, अवयवदान कोण करू शकते, कोणकोणते अवयव दान केले जातात, जिवंतपणी आणि मेंदूमृत झाल्यावर अवयवदान व त्याची शासकीय प्रक्रिया कशी केली जाते, याविषयी सखोल माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लोकांपर्यंत अवयवदान विषयी माहिती पोचविण्याचे आवाहन डॉ. अघोर यांनी व्याख्यानात केले. प्राचार्य चंद्रकांत दियावकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शहरातील नागरिकांपर्यंत अवयवदानाविषयी जनजागृतीचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाला नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे डॉ. संदीप काळे, प्रत्यारोपण समन्वयक अमोल दुगजे, मालेगावमधील प्रतिनिधी गोरख निकम आदींसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. अवयवदान विषयी अधिक माहितीसाठी प्रत्यारोपण समन्वयकांशी ९४२२८१४४०० या क्रमांकावर संपर्काचे आवाहन केले.

प्रबंधभूमी®
आवाज जनतेचा... जनते पर्यंत...
मुख्यसंपादक : विशाल भा.गोसावी (गिरीराज)मो.9130998291

# म स .गा .महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे यश

प्रबंधभूमी न्युज

मालेगांव कॅम्प : मास्टर्ससाठी संयुक्त प्रवेश परीक्षा ( JAM ) ही भारतीय तंत्रज्ञान संस्था (IITs), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IITs) तसेच मास्टर ऑफ सायन्स (M.Sc.) आणि इतर पदव्युत्तर विज्ञान कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी दरवर्षी घेण्यात येणारी राष्ट्रीय पातळीवरची परीक्षा आहे. या परीक्षेमध्ये महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून यामध्ये गुलाम हुसेन नदीम हुसेन याची आय आय टी पटना ,भोये रुपेश पंडित याची आय आय टी



भिलाई ,सूर्यवंशी ऋतुजा संजय, आयआयटी पंजाब, तर ठाकूर संकेत सुधाकर याची फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे पुढील शिक्षणासाठी निवड झालेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक व आदिवासी सेवा समितीचे जनरल सेक्रेटरी मा. परिवहन व राजशिष्टाचार राज्यमंत्री डॉ .प्रशांत हिरे, संस्थेचे समन्वयक मा .शिक्षण आमदार डॉ .अपूर्व हिरे यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या तर प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी सत्कार करून अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे डॉ. मनीष सोनवणे उपस्थित होते. ह्या विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. के. एस. ठाकरे, प्रा. चेतन येवले, प्रा. सूर्यकांत तिवारी, प्रा. सतीश मांडवडे, प्रा.अंकुश मायाचार्य, प्रा. हितेश सोनावणे, प्रा. मानसी ठोके यांचे मार्गदर्शन लाभले.

19/8

दैनिक लोकनामा
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक



# मसगाच्या बॉक्सिंगपटूंचे यश

लोकनामा प्रतिनिधी

मालेगाव : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व मालेगाव महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मनपास्तरीय बॉक्सिंग व किक बॉक्सिंग शालेय क्रीडा स्पर्धा नुकत्याच झाल्या.

तनिष्का रामदेव गवळी किक बॉक्सिंग व बॉक्सिंगमध्ये ५७ किलो वजनी गटात प्रथम, कार्तिक सोमनाथ आणे ६६ किलो वजनी गटात प्रथम, तर साई योगेश सावंत ६२ किलो गटात प्रथम आला. या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, समन्वयक डॉ. अद्वय हिरे-पाटील, संस्थेच्या सांस्कृतिक विभागप्रमुख तथा विश्वस्त संपदा हिरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कुलसचिव रघुनाथ शेलार, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले.

16/8

नियोजित मालेगांव जिल्ह्याचे मुखपत्र
आजचा
दिनकर

# मसगा महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव-कॅम्प येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी. जी. दिघावकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. प्राचार्यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या .

याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी संचालन केले. तसेच सांस्कृतिक विभागातर्फे देशभक्तीपर नृत्य व गीतांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध ध्वज क्षेत्राचे सादरीकरण केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.टी .एस . सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.पी . एस . पाटील ,डॉ.एम . बी . सोनवणे ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम. एस. कुलकर्णी , शैक्षणिक पर्यवेक्षक रवींद्र मोरे , शैक्षणिक समन्वयक प्रा. प्रवीण पवार, एमसीव्हीसी विभागाचे उपप्राचार्य प्रा . अजिंक्य ठाकरे , कुलसचिव रघुनाथ शेलार , कार्यालयीन अधीक्षक जयवंत कठ्यारे , राजेश निकम , राष्ट्रीय छत्र सेनेच्या लेफ्टनंट भाग्यश्री वाघमारे , सी टी ओ डॉ. अतुल वाघ , राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ए . बी . वाकचौरे ,डॉ. ए. डी .बाविस्कर ,प्रा. वैशाली साळुंखे यांच्यासह प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

15/8

दैनिक लोकनामा



## 'मसगा'च्या बुद्धिबळ खेळाडूंचे यश

**मालेगाव :** क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद नाशिक, तसेच मालेगाव महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शासकीय मनपास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांतर्गत शालेय बुद्धिबळ स्पर्धा झाल्या. विभागीय स्पर्धांसाठी मुलांमध्ये येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रेम राम अहिरे, पुरुषोत्तम घुमाळ, हर्षराज दत्तात्रय काथेपुरी, तर मुलींमध्ये मृणाल सुनील भदाणे यांची निवड झाली. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, विश्वस्त डॉ. अद्वय हिरे-पाटील, विश्वस्त संपदा हिरे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कुलसचिव रघुनाथ शेलार, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व क्रीडा संचालक संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

13/8

प्रबंधभूमी®
आवाज जनतेचा... जनते पर्यंत...
मुख्यसंपादक : विशाल मा.गोसावी (गिरीराज)मो.9130998291

# मसगा महाविद्यालयात घरघर तिरंगा उपक्रम



**प्रबंधभूमी न्युज**

**मालेगाव कॅम्प :** घर तिरंगा मोहिमेची तिसरी आवृत्ती 9 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2024 या कालावधीत चालेल, ज्यामुळे नागरिकांना घरोघरी भारतीय ध्वज प्रदर्शित करण्यास प्रोत्साहित केले, या निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षणमंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले त्यांनी हर घर तिरंगा या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला . या कार्यक्रमा साठी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, . डॉ मनीष सोनवणे, . डॉ प्रविण पाटील, यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी . प्रा.अशोक वाघचौरे , प्रा .अनंत बाविस्कर, प्रा वैशाली साळुंखे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे 200 विद्यार्थी उपस्थित होते.

11/8

सांज. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात हर घर तिरंगा रॅली...




मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव-कॅम्प येथे हर घर तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली. रॅलीच्या सुरवा-तीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही मोहीम देशभरातील नागरिकांना त्यांच्या घरावर राष्ट्रध्वज फडकवण्यास प्रोत्साहित करते, देशभक्ती वाढवणे आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करणे हे देखील यामागे उद्दिष्ट आहे असे त्यांनी विशद केले.

जनजागृती व्हावी यासाठी राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांनी रॅली मध्ये उत्स्पूर्तपणे सहभाग नोंदविला. वंदे मातरम, हरघर तिरंगा, भारत माता कि जय अश्या विविध देशभक्तीपर घोषणा देत जनजागृती करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य उपप्राचार्य डॉ.टी. एस. सावळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम. एस. कुलकर्णी, शैक्षणिक पर्यवेक्षक रवींद्र मोरे, राष्ट्रीय छात्र सेनेच्या लेफ्टनंट भाग्यश्री वाघमारे, सी टी ओ डॉ. अतुल वाघ आदी उपस्थित होते.

11/8

प्रबंधभूमी

# मसगा महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाचे उद्घाटन

**प्रबंधभूमी न्युज**

**मालेगांव कॅम्प :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाचे उद्घाटन आयपीएस अधिकारी श्री सुरेश गुंजाळ यांच्या हस्ते करण्यात आले ,याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते यावेळी कार्यक्रमाप्रसंगी श्री सुरेश गुंजाळ यांनी मी अँड सक्सेस या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांची तयारी ह्या विषयी मार्गदर्शन केले,त्याचप्रमाणे महाविद्यालयामार्फत स्पर्धा परीक्षा विभाग चालवला जातो त्याचे त्यांनी समाधान व्यक्त केले व या विभागाचा शहरी त्याचबरोबर



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा अशी अशा व्यक्ती केली. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करून घ्यायला हवे महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना आम्ही सर्व सुविधा उपलब्ध करून देऊ तुम्ही फक्त चांगला अभ्यास करून महाविद्यालयाच्या नावलौकिकासस भर घालावी अशी अशा व्यक्ती केली,यावेळी महाविद्यालयातील जे विद्यार्थी एमपीएससी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन PSI म्हणून नेमणूक झाली अशा विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला ,या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक डॉ. मनीष सोनवणे उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाचे समन्वयक प्रा. भरत शेवाळे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. डॉ. राज त्रिभुवन यांनी केले याप्रसंगी प्रा. अनंत बाविस्कर,प्रा. चेतन येवले यांच्यासह महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात डॉ. रंगनाथ जयंती साजरी

मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय येथे भारतीय पुस्तकालय तज्ञ डॉ एस. आर . रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दियावकर हे अध्यक्ष स्थान होते त्यांनी सर रंगनाथन यांच्या बद्दल माहिती सांगताना सांगितले की आधुनिक भारता-तील ग्रंथालयांच्या विकासात डॉ. रंगनाथन् ह्यांचा फार मोठा वाटा आहे. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडं



विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन् ह्यांनीच रूजवला. नंतर तो जोपासण्यासाठीही आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. डॉ. रंगनाथन् ह्यांनी मांडलेले पाच पुस्तकालयविज्ञान सिद्धांत हे भारतीय पुस्तकालयविज्ञानाचा पाया समजले जातात. डॉ. रंगनाथन् ह्यांचा वाढदिवस भारतात 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालय प्रा. डॉ. निलेश नागरे यांनी केले तर आभार स्वप्नील वाघ यांनी मानले याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, ग्रंथालय कर्मचारी अहिरे, बोराळे, नरवडे उपस्थित होते.

9/8

प्रबंधभूमी®
आवाज जनतेचा... जनते पर्यंत...
मुख्यसंपादक : विशाल मा.गोसावी (गिरीराज)मो.9130998291

# मसगा महाविद्यालयात अपूर्व दत्तक योजना

**प्रबंधभूमी न्युज**

**मालेगाव कॅम्प :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक, सिनेट सदस्य, मा .शिक्षक आमदार डॉ. अपुर्व हिरे यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून गरीब, अनाथ, दिव्यांग होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी समाजाभिमुख अशी अपूर्व दत्तक योजना राबवण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर अध्यक्षस्थानी . होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील आतापर्यंत



महाविद्यालयातील ३८ गरीब, गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व महाविद्यालयाकडून स्वीकारण्यात आले आहे ,ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व महाविद्यालयाने स्वीकारले आहे अशा विद्यार्थ्यांची प्रवेश फी , वह्या ,पुस्तके व परिक्षा फि याच्यासाठी लागणारा खर्चाचा धनादेश विद्यार्थ्यांना देण्यात आला . या योजनेत ६४ प्राध्यापकांनी सहभाग घेतला व सामाजिक उत्तरदायित्व दाखविले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रविण पाटील,महाविद्यालयीन अपूर्व दत्तक योजना समितीचे प्रमुख डॉ. रमेश निकम , यांच्यासह महाविद्यालयातील अधिकारी वर्ग , प्राध्यापक वृंद उपस्थित होते .

प्रबंधभूमी®
आवाज जनतेचा... जनते पर्यंत...
मुख्यसंपादक : विशाल भा.गोसावी (गिरीराज)मो.9130998291

# सीड ब्रॉडकास्टिंग" एक सामाजिक भान



**प्रबंधभूमी न्युज**

**मालेगांव कॅम्प :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, महाराजा सयाजीराव महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या 'GO GREEN' या अभियानांतर्गत निसर्ग संवर्धनाचे व निसर्ग समृद्धीचे उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत सीड ब्रॉडकाटिंग हा महत्वपूर्ण उपक्रम येतो. दरवर्षी पावसाळ्यादरम्यान निंब. चिंच, आंबा,बेल, करंज, गुलमोहर, आवळा, बेहडा, जांभूळ अश्या विविध वनस्पतीच्या बियांचे संकलन करण्यात येते, वनस्पतीशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी वर्षभर अशा विविध वनस्पतींच्या बियांचे संकलन करीत असतात व सीड ब्रॉडकास्टिंग या उपक्रमांतर्गत डोंगर पठार किंवा पडीत जमिनीत या बियांचे रोपण करीत असतात यासोबत विविध वनस्पतींचे रोप तयार करून त्याची लागवड देखील करण्यात येते यावर्षी संस्थेचे समन्वयक मा.आ.डॉ.अपूर्व हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त करजगव्हाण शिवरातील विद्यावासिनी डोंगर पठारावर जवळपास एक लाख बियांचे प्रसारण करण्यात आले. मागील काही वर्षात तिसगाव, वरदळी, गळणा किल्ला, मुंजऱ्या डोंगर, तळवाडे अश्या अनेक भागात जाऊन वनस्पतीशास्त्र विभागातर्फे सुमारे सात लाख बियांचे प्रसारण करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रविण पाटील, विभागप्रमुख डी.जी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविण्यात आली, विभागातील प्राध्यापक डॉ. डी यु अहिरे, डॉ.जे.टी.जाधव, डॉ.अतुल वाघ, प्रा. प्रवीण निकम, प्रा. प्राची पवार, प्रा. सुयोग देवरे, प्रा. अमित द्राळीज आणि विद्यार्थ्यांसमेवत स्थानिक तरूण व माजी विद्यार्थी देखील या उपक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर , उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, शै. समन्वयक डॉ. मनिष सोनावणे यांनी विभागाच्या या अनोख्या निसर्ग संवर्धनाच्या कार्याचे कौतुक केले तसेच वनस्पती शास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी ह्या मौलिक कार्यात सहभागी झाले याबद्दल विभागाचे अभिनंदन केले.

प्रबंधभूमी®
आवाज जनतेचा... जनते पर्यंत...
मुख्यसंपादक : विशाल भा.गोसावी (गिरीराज)मो.9130998291

# रसायनशास्त्र विभागातर्फे वृक्ष आपले मित्र उपक्रम

प्रबंधभूमी न्युज



**माल्रेगाव कॅम्प :** ऑगस्ट महिन्यातील पहिला रविवार हा राष्ट्रीय मैत्री दिवस म्हणून साजरा करण्यात येतो, या दिवसा चे औचित्य साधून महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे वृक्ष आपले मित्र या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्यानिमित्ताने महाविद्यालय परिसरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते विविध रोपांचे रोपन करण्यात आले ,

या प्रसंगी डॉ. दिघावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की मैत्री ही फक्त मनुष्याबरोबरच किंवा प्राण्यांबरोबरच होते असे नाही तर आज वृक्षांबरोबर मैत्री करणे ही काळाची गरज आहे वृक्ष जगले तरच पृथ्वी राहणार आहे त्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करणे महत्त्वाचे आहे.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, प्रो. डॉ. विनायक कदम ,डॉ. पंकज पवार ,डॉ. चंद्रकांत आहेर, यांच्यासह रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ.नंदकिशोर शिरसाट, प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी परिश्रम घेतले.

नियोजित मालेगांव जिल्ह्याचे मुखपत्र
आजचा
दिनकर

# मसगा कॉलेजात 'एक पेड माँ के नाम' उपक्रम



मालेगांव । केंद्रीय पर्यावरण मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्फत विश्व पर्यावरण दिवसा चे औचित्य साधून 'एक पेड माँ के नाम' या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे, या निमित्ताने महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथील राष्ट्रीय सेवा योजने मार्फत या उपक्रमास वृक्षरोपन करून सुरवात करण्यात आली. या प्रसंगी मालेगावातील प्रसिद्ध मधुमेह रोग तज्ञ डॉ विकास देसले व मालेगांव सायकलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सतीश काकळीन यांच्या हस्ते 'एक पेड माँ के नाम' उपक्रमात ची विविध रोपे लावून सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी सांगितले की प्रत्येकाने झाडे लावावी व झाडे लावण्या साठी दुसऱ्यांना देखील प्रोत्सा हीन करावे व झाडे लावून त्याचे संगोपन करावे. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक वाघचौरे, प्रा. अनंत बाविस्कर, प्रा वैशाली साळुंखे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# मसगा कॉलेजात 'आरोग्यावर बोलू काही' या विषयावर व्याख्यान संपन्न



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग व मालेगाव सायकलिंग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक मा. डॉ. अपूर्व हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यवर बोलू काही या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, यासाठी मालेगावातील प्रसिद्ध मधुमेह तज्ञ डॉ. विकास देसले, औषध व्यावसायिक सतीश काकळीज यांना आमंत्रित केले होते. डॉ. विकास देसले यांनी मधुमेहाची कारणे व उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले व रोजची दिनचर्या, आहार यावर माहिती दिली. मधुमेहावर प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत माहिती दिली तर श्री. सतीश काकळीज यांनी सायकलिंगच्या माध्यमातून आपण कसे आजारावर मात करू शकतो या विषयावर सखोल मार्ग दर्शन केले. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय मनोगतात आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज बनली आहे. आरोग्य चांगले असेल तर आपण सर्व कृती करू शकतो व आरोग्य सांभाळण्यासाठी आपण सजग असले पाहिजे असे डॉ दिघावकर यांनी सांगितले. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे महाविद्यालयाचे कुलसचिव रघुनाथ शेलार उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडा मार्गदर्शक सतोष जाधव यांनी केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडुरकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधीक्षक वित्त विभाग डॉ. राजेश निकम व भूषण ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

## Maharaja Sayajirao Gaikwad Arts, Science & Commerce College

लोकनामा



### मसगा महाविद्यालयात कारगिल विजय दिवस

**मालेगांव कॅम्प :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी छात्रांना मार्गदर्शन केले. कारगिल विजय कसा मिळाला, त्याचे महत्त्व आणि कारगिल युद्धात योगदान दिलेल्या शहिदांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी छात्रांना कारगिल विजय दिनानिमित्त माहितीपट दाखवण्यात आला. कार्यक्रमात छात्रांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. कार्यक्रम यशस्वितेसाठी ४८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल शैलेंद्रकुमार गुप्ता, ए.ओ. सुदीप मिस्त्रा यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, राष्ट्रीय छत्र सेनेचे अधिकारी लेफ्ट. बी. बी. वाघमारे, सी.टी.ओ. सूर्यभान सांगळे उपस्थित होते. कॅडेट कावेरी चौधरी हिने सूत्रसंचालन, तर रेवती निकम हिने प्रास्ताविक केले.




26/7

# मसगात जिल्हा क्रिडाधिकारी यांची क्रीडा स्पर्धा संदर्भात सह विचार सभा

**मालेगांव ।**

मसगा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे सभागृहात शैक्षणिक वर्ष, २०२४ -२५ पावसाळी क्रीडा स्पर्धासाठी क्रिडाशिक्षकांची सहविचार सभा संपन्न झाली. या सभेसाठी महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ. सी. जी.दिघावकर,नाशिक जिल्हा कार्यालयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुनंदा पाटील, तालुका क्रीडा अधिकारी महेश पाटील, तालुका क्रीडा अधिकारी संदीप ढाकणे, तालुका क्रीडा अधिकारी चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे, म.न.पा. क्षेत्रातील क्रीडा अधिकारी शाहिद अन्सारी व क्रीडा शिक्षक शशी पवार तसेच विविध शाळेतील क्रीडा शिक्षक, शिक्षिका, मार्गदर्शक, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वतीचे प्रतिमा पूजन करून उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी क्रीडा सहभाग जास्तीत जास्त वाढावा व राज्य ,राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंनी पोहोचावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. . महेश पाटील यांनी प्राथमिक नोंदणी व सॉफ्टवेअर मध्ये झालेला बदल यावर मार्गदर्शन केले कशी माहीती भरावी व नियोजन कसे करावे यावर मार्गदर्शन केले जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी खेळाडू व खेळ यात येणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करून समस्यांचे समाधान केले. तसेच क्रिडा प्रकारात आपला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना तुम्हीच सर्व क्रिडा शिक्षक पैलु पाडु शकतात. ही जबाबदारी लीलया पार तुम्ही करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.व बहुमोल असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक शशी पवार यांनी केले प्रास्ताविक प्रा. शाहिद अन्सारी यांनी केले व आभार प्रदर्शन तालुका क्रीडा प्रमुख भारत काकड यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रिडाशिक्षक प्रा संतोष जाधव व संदीप कोदुंळकर यानी प्रयत्न केले

24/7

# मसगा महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



**मालेगाव ।**

गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय या ठिकाणी दिनांक २३ जुलै २०२४ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १६८ वी जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रम चे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .चंद्रकांत दिघावकर हे होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मॅ न : न न प्रतिमेची पूजन करून पुष्प अर्पण करण्यात आले, त्यानंतर प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी आपल्या मनोगतात लोकमान्य टिळक यांचा जीवन परिचय तसेच स्वातंत्र्य लढ्यातील योगदान यासंबंधीची माहिती देताना सांगितले की त्यांनी स्वतंत्र लढ्याबरोबरच एक नवीन शिक्षण प्रणाली तयार करताना डेक्कन एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली त्याद्वारे भारतीय संस्कृतीचा प्रसार व प्रचार करून तरुण भारतीयांना राष्ट्रवादी विचार शिकविले .या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील तसेच कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा रविंद्र मोरे , एमसीव्हीसी चे उपप्राचार्य अजिक्य ठाकरे ,कार्यालयीन अधीक्षक श्री जयवंत कठारे यांच्या सह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सी.डी. राजपूत यांनी केले.

23/7

# म स गा महाविद्यालयात प्रथम वर्ष विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन

प्रबंधभूमी न्युज



मालेगाव कॅम्प : महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रथम वर्ष विज्ञान या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते ,या आयोजना मागचा हेतू हा की विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख व्हावी व महाविद्यालयातील सोयी, सुविधा व इतर सर्व महाविद्यालयातील घटकांची विद्यार्थ्यांची ओळख व्हावी.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते. यावेळी महाविद्यालयाचे शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. डॉ. प्रविण पाटील यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख करून दिली व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात झालेले बदल समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या काळात मूल्यशिक्षण खूप महत्वाचे आहे याची जाणीव करुन दिली तर ,महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणानंतरच्या वाटा व महाविद्यालयातील शिस्त यासंबंधी मार्गदर्शन केले . प्रा. डॉ. अतुल वाघ यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी शैक्षणिक सन्मवयक डॉ. मनिष सोनवणे, विज्ञान विभागचे सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21/7

# महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आरोग्य विषयक जनजागृती शिबिर संपन्न.



प्रबंधभूमी न्युज

**मालेगाव कॅम्प :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे ग्रुप च्या कोषाध्यक्ष डॉ. स्मिताताई हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य विषयक जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास डॉ. मानसी महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. मानसी महाजन यांनी आपल्या व्याख्यानातून पावसाळ्यात होणाऱ्या विविध संसर्गजन्य आजारांची माहिती दिली. तसेच पावसाळ्यातील विविध आजारांवर कोणते उपचार करावेत, आजार होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, संसर्गजन्य आजारांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी काय करावे यासंबंधी मार्गदर्शन केले. पावसाळ्यात आपला दैनंदिन आहार हलका व पौष्टिक कसा ठेवता येईल यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिवाकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून तरुण तरुणींनी विशेषता कोणती काळजी घ्यावी, पावसाळ्यातील आजारापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी काय उपाय करावेत या संबंधी माहिती दिली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी देखील विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे व डॉ. प्रवीण पाटील यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, कनिष्ठ विभागाचे शैक्षणिक पर्यवेक्षक रवींद्र मोरे, तसेच किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे हे उपस्थित होते. महाविद्यालयातील समाज श्री डॉ. प्रशांतदादा हिरे सामान्य आरोग्य केंद्राच्या संचालिका डॉ. भारती खैरनार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. दिलीप अहिरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर शिबिरास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती नोंदवली.

14/7

# मसगा कॉलेजात पेपर बॅग डे साजरा



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने जागतिक पेपर बॅग डे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर तर प्रमुख वक्ते भुगोल विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. चंद्रशेखर निकम हे होते. डॉ निकम यांनी पेपर बॅग डे विषयी माहिती व महत्व सांगताना सांगितले की हा दिवस १९ व्या शतकात सुरू झाला, फ्रान्सिस वूली यांनी १८५२ मध्ये पहिल्या पेपर बॅग मशीनचा शोध लाव ला. जागतिक कागदी पिशवी दिन दरवर्षी १२ जुलै रोजी साजरा केला जातो. प्लास्टिक पिशव्यां ऐवजी कागदी पिशव्या वापरण्यास प्रोत्साहन देणे हा या दिनाचा उद्देश आहे. हा दिवस आपल्या पर्यावरनावर प्लास्टिक च्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूकता पसरवण्या साठी समर्पित आहे. नॉन-बायोडिग्रेडेबल प्लास्टिक पिशव्यांप्रमाणे, कागदी पिशव्या पर्यावरणास अनुकूल आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिघावकर यांनी आरआर आर हि त्रिसुत्री सांगितली, यातील पहिला आर म्हणजे रिड्युस, दुसरा आर म्हणजे रियुज तर तिसरा आर म्हणजे रिसायकल, आज पर्यावराचा ऱ्हास होतांना दिसत आहे, जर पर्यावरण वाचवायचे असेल तर त्या त्रिसुत्रा चा आपण वापर करायला हवा असे डॉ दिघावकर म्हणाले. या कार्यक्रमा साठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील , कॅप्टन आर.ए.पवार, लेफ्ट बी. बी. वाघमारे, सी.टी. ओ. एस.ए. सांगळे, सी. टि. ओ. निलेश नागरे यांच्या सह छात्र सैनिक उपस्थित होते

12/7

# लोकसंख्या नियंत्रणासाठी जागतिक धोरण काळाची गरज आहे – डॉ. बी एम सोनवणे



**प्रबंधभूमी न्यूज**

**मालेगाव कॅम्प :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भूगोल विभागात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बी. एम. सोनवणे प्रमुख वक्ते म्हणून लाभले. जगामध्ये लोकसंख्येचे प्रमाण विषम स्वरूपात झालेले आहे. आर्थिक विकास जसजसा गतिमान होऊ लागला तसी जागतिक पातळीवर लोकसंख्या देखील वेगाने वाढू लागली आहे. १८०४ मध्ये जगाची लोकसंख्या एक अब्ज होती ती १९२७ मध्ये दोन अब्ज झाली. लोकसंख्या दुप्पट व्हायला १२३ वर्षे लागले. त्यानंतर आर्थिक विकासाची प्रक्रिया जशी गतिमान झाली तशी लोकसंख्या ही गतिमानतेने वाढली. १९२७ मध्ये असलेली दोन अब्ज लोकसंख्या पुढच्या ३३ वर्षात म्हणजेच १९६० मध्ये ती तीन अब्ज झाली त्यानंतर पुढील १४ वर्षात म्हणजेच १९७४ मध्ये ती चार अब्ज आणि त्यानंतर तेरा वर्षांनी म्हणजे १९८७ मध्ये ती पाच अब्ज झाली. लोकसंख्या वाढीचा हा वेग उपलब्ध संसाधनांसाठी धोक्याची घंटा होती म्हणून जागतिक पातळीवर डॉ. के सी झकारिया यांच्या अथक प्रयत्नाने संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक लोकसंख्या नियंत्रणात राहावी व लोकसंख्या वाढीचे धोके जागतिक स्तरावर चर्चिले जावे यासाठी ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. १९९९ मध्ये जागतिक लोकसंख्या ही सहा अब्ज झाली त्यासाठी फक्त बारा वर्षे लागले त्यानंतर २०११ मध्ये जगाची लोकसंख्या सात अब्ज झाली आणि २०२२ मध्ये जगाची लोकसंख्या ही आठ अब्ज झालेली आहे. लोकसंख्या ही पर्याप्त असलेली कधीही योग्य परंतु ती अतिरिक्त झाल्यास संसाधनांवर अतिरिक्त ताण होते आणि वायुप्रेम भविष्यात मानवी जीवन धोक्यात येऊ शकेल यासाठी जागतिक पातळीवर लोकसंख्या नियंत्रणासाठी व्यापक स्वरूपामध्ये उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. असे विचार डॉ. बी. एम. सोनवणे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी देशातील लोकसंख्या ही गुणात्मक दृष्ट्या फायद्याची असते मात्र तिच्यात संख्यात्मक वाढ होत असेल तर ती नक्कीच देशासाठी लाभदायक नसते असे मनोगत व्यक्त केले. व्याख्यान आयोजनाचा हेतू प्रास्ताविकेतून भूगोल विभाग प्रमुख डॉ. सी. एस. निकम यांनी स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. र. डी. पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एस. बी. बच्छाव यांनी मानले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, सर्व विभाग प्रमुख, सहकारी बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11/7

सकाळ

# लोकनेते व्यंकटराव हिरे यांना अभिवादन

## प्रतिमापूजन, वृक्षारोपणासह विविध उपक्रमांचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा



मालेगाव शहर : येथील लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करताना आरबीएच कन्या विद्यालयातील शिक्षिका.

मालेगाव शहर, ता. ४ : येथील महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती या महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थेचे संवर्धक लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील विविध शाळांमध्ये अभिवादन करण्यात आले. प्रतिमापूजन, भाषणे व वृक्षारोपण असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

### एलव्हीएच माध्यमिक विद्यालय

येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक के. बी. आहिरे होते. उपशिक्षक पी.पी.राजपूत यांनी हिरे यांच्या कार्याची माहिती दिली. के. आर. सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले एस. टी. जगताप यांनी आभार मानले.

### केबीएच विद्यालय

के.बी.एच विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य प्रफुल्ल निकम यांनी प्रतिमापूजन केले. उपप्राचार्य विश्वास पगार, पर्यवेक्षक संजय शिंदे, जितेंद्र बच्छाव, संजय चव्हाण, कार्यालयीन प्रमुख सुरेश मालू, प्रमोद पिंपळसे, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र बच्छाव, नाना शिरोळे, अर्जुन खेडकर, योगेंद्र ठोके उपस्थित होते. व्याख्याते डॉ. श्रीकांत पाटील यांनी हिरे यांच्या कार्याविषयी माहिती दिली. केशव देवरे यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत पवार यांनी आभार मानले.

### हिरे महिला महाविद्यालय

पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. रजनी पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन केले. यावेळी वनपरिमंडळ अधिकारी अतुल देवरे, प्राचार्य डॉ. पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.दीपाली चंद्रमोरे यांनी सूत्रसंचालन केले. शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.तेजस्विनी सोनटक्के, कार्यालयीन अधिक्षक एल.के.निकम, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### मसगा महाविद्यालय

येथे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिपावकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मध्यवर्ती ग्रंथालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, प्रा. मिलिंद कुलकर्णी, प्रा. अजिंक्य ठाकरे, डॉ. प्रवीण पाटील, प्रा. रवींद्र मोरे, डॉ. अर्जुन नेरकर, डॉ. सी. डी. राजपूत, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे, डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नरेंद्र डोखे यांनी आभार मानले.



# मसगा महाविद्यालयात व्याख्यान, वृक्षारोपण

**मालेगाव** : महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिपावकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ. दिपावकर यांनी लोकनेत्यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी हाती घेतलेले सर्व कार्य लोकनेते हिरे यांनी समर्थपणे पुढे नेले. संघटन कौशल्यात लोकनेते निपुण होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी व्यंकटराव हिरे यांनी प्रयत्न केले, कृषी क्षेत्रासाठी बीज, रासायनिक खते, बी-बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात त्यांची मोठी भूमिका होती, असे डॉ. दिपावकर यांनी सांगितले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मध्यवर्ती ग्रंथालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, प्रा. अजिंक्य ठाकरे, डॉ. प्रवीण पाटील, प्रा. रवींद्र मोरे, प्रा. डॉ. अर्जुन नेरकर, प्रा.डॉ. सी. डी. राजपूत, जयवंत कट्यारे, व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी आभार मानले.

# मसगा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे पुण्यतिथी निमित्ताने व्याख्यान व वृक्षारोपण संपन्न

[illegible]



[illegible]

# TODAY'S NEWS

**News Paper:- Lokmat Times** LOKMAT TIMES **Date:- 29/06/2024**

## Girl students receive free bus passes

LOKMAT NEWS NETWORK
MALEGAON, JUN 29

Girl students of Maharaja Sayajirao Gaikwad Arts, Science and Commerce College run by Mahatma Gandhi Vidya Mandir in Malegaon, have received free bus passes from the Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) under the Punyashlok Ahilyabai Holkar Yojana. A total of 160 girl students were distributed passes at this time.

The girl students of rural areas need to travel by ST buses to attend college. For this, they need to visit pass centres or bus depots, often having to stand in long queues to get their passes. Hence, to end this inconvenience of the students, the institution, along with the Principal Dr Chandrakant Dighavkar, Vice-Principal Prof Milind Kulkarni, and Supervisor Prof Ravindra More, have made arrangements for the students to receive their ST passes directly at the school.

Chairman of the Transport Committee Prof Hitesh Pawar, members Prof Milind Pawar, and Prof Pankaj Patil were present on this occasion.



**Received free bus passes from the MSRTC under the Punyashlok Ahilyabai Holkar Yojana.**

# Maharaja Sayajirao Gaikwad College Malegaon

## मसगा महाविद्यालयात राजर्षी शाहूंना अभिवादन

**मालेगाव** : येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, एमसीव्हीसीचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे व पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे उपस्थित होते.

प्रा. मोरे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. शाहू महाराजांनी समाजातील विषमता व भेदाभेद कमी करण्यासाठी प्रयत्न केले. गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. ए. डोखे यांनी आभार मानले.

# Maharaja Sayajirao Gaikwad College Malegaon

## महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय

मालेगाव : येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची शतकोत्तर जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला व उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, एमसीव्हीसीचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे व पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. रवींद्र मोरे, डॉ. अनिल सावळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एन. ए. डोखे यांनी मानले.

# Maharaja Sayajirao Gaikwad College Malegaon

Newspaper :- sakal

Deda :- 27/20/24

सकाळ

## मसगा महाविद्यालयात प्रतिमापूजन कार्यक्रम



**मालेगाव शहर** : मसगा महाविद्यालयातर्फे छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना शिक्षक.

**मालेगाव शहर** : येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती साजरी झाली. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, एमसीव्हीसीचे उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे व पर्यवेक्षक रवींद्र मोरे उपस्थित होते. प्रा. रवींद्र मोरे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. ए. डोखे यांनी आभार मानले.

# Maharaja Sayajirao Gaikwad College Malegaon

२८ जून २०२४

## महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**मालेगाव।**

येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची शतकोत्तर जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे व पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. रवींद्र मोरे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. शाहू महाराजांनी समाजातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. देवदासींना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी कायद्याची अंमलबजावणी केली. असे महत्त्वपूर्ण माहिती रवींद्र मोरे यांनी दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी छत्रपती शाहू महाराज हे दूरदृष्टीचे राजे होते. शाहू महाराजांनी समाजातील स्पृश्य अस्पृश्य भेद दूर करण्यासाठी पावले उचलली. शाहू महाराजांचे जीवन कार्य आजही सगळ्यांना प्रेरणास्त्रोत आहे असे डॉ. अनिल सावळे यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एन. ए. डोखे यांनी मानले.

# म.स.गा. महाविद्यालयात योग दिन साजरा



मालेगांव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात दि २१ जून २०२४ रोजी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन स्वत: साठी व समाजासाठी योग या घोषवाक्यानुसार साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय योगा खेळाडू कु. धनश्री देवरे व कु. तनिष्का खैरनार यांनी उपस्थितांना योगाचे महत्व सांगत सहज योगातून ध्यान धारणा करावयास लावले व विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांकडून योगासने करून घेत योगाचे मानवी जीवनातील महत्व पटवून दिले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उपप्राचार्य डॉ. अनिल साळवे , डॉ मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिक्य ठाकरे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक श्री. जयवंतराव फटांगरे यांच्या सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, प्रशासकीय कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदिप कोंडूरकर यांनी केले.

# Maharaja Sayajirao Gaikwad Arts, Science & Commerce College



दैनिक लोकनामा

## आरोग्य, सामाजिक कल्याणासाठी योग

### डॉ. दिघावकर : मसगा महाविद्यालयात योगाची प्रात्यक्षिके



**लोकनामा प्रतिनिधी**

**मालेगाव :** येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन 'स्वतःसाठी व समाजासाठी योग' या घोषवाक्यानुसार साजरा करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी सांगितले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय योगा खेळाडू धनश्री देवरे व तनिष्का खैरनार यांनी योगाचे महत्त्व सांगत सहजयोगातून ध्यानधारणा करावयास लावले व योगासनांची प्रात्यक्षिके दाखवून योगासने करून घेतली.

प्राचार्य डॉ. दिघावकर, उपप्राचार्य डॉ. टी. एस. साळवे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, उपप्राचार्य अजिंक्य ठाकरे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कटवारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करून सूत्रसंचालन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप कोंडुस्कर यांनी आभार मानले.

# म.स.गा. महाविद्यालयात योग दिन साजरा

**मालेगांव ।**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात दि २१ जून २०२४ रोजी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन स्वत:साठी व समाजासाठी योग या घोषवाक्यानुसार साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय योगा खेळाडू कु. धनश्री देवरे व कु. तनिष्का खैरनार यांनी उपस्थितांना योगाचे महत्व सांगत सहज योगातून ध्यान धारणा करावयास लावले व विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांकडून योगासने करून घेत योगाचे मानवी जीवनातील महत्व पटवुन दिले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उपप्राचार्य डॉ. अनिल साळवे, डॉ मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा अजिंक्य ठाकरे जयवंतराव कट्यारे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, प्रशासकीय कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदिप कोंडूरकर यांनी केले.